# मेट्रो स्थानके सुरक्षित - सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ यांच्या अंतिम निरीक्षण अहवालात नमूद (स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्ट)

**दिनांक: २५/५/२०२३**





काही अभियंत्यांनी मेट्रो स्थानकांच्या त्रुटी संबंधी मेट्रोला पत्राद्वारे कळविले होते. मेट्रोने त्यावर त्वरित कार्यवाही करत सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाची मेट्रो स्थानकांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यासंबंधी नेमणूक केली. त्याबरोबरच मेट्रो स्थानकांच्या सर्व त्रुटी निरसनाचे काम पूर्ण केले. मेट्रोने संबंधित अभियंत्यांना धन्यवाद देऊन सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाला स्ट्रक्चर ऑडिट करण्याचे काम देण्यात आले आहे असे कळविले

आज दिनांक २५ मे २०२३ रोजी सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाने मेट्रो स्थानकांचा स्ट्रक्चरल पाहणीचा अंतिम अहवाल मेट्रोला दिला. अहवालात सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाने स्पष्ट निर्वाळा दिला आहे की, मेट्रोची स्थानके ही सुरक्षित आहेत. स्थानकांना भेट देऊन त्यांचे निरीक्षण करण्यात आले तसेच मेट्रो स्थानकांच्या संरचनेचे विश्लेषण करून त्यांची भूकंप विरोधक क्षमता देखील पडताळण्यात आली. त्यामध्ये असे निदर्शनास आले आहे की, मेट्रो स्थानकांची पर्याप्त सुरक्षाद्वारे आखणी करण्यात आली आहे आणि मेट्रोची स्थानके सुरक्षित आहेत.